# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांक:28.04.2026** **वार: मंगळवार**

---

1. पंतप्रधान नरेंद्र मोदी आज सिक्कीम राज्याच्या स्थापनेच्या सुवर्णमहोत्सवी समारंभात सहभागी होणार. पंतप्रधान आजपासून दोन दिवस वाराणसीच्याही दौऱ्यावर
2. पश्चिम बंगालमध्ये विधानसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यासाठी उद्या मतदान
3. लडाखमध्ये पाच नवीन जिल्ह्याच्या निर्मितीला नायब राज्यपालांची मंजुरी
4. अमेरिकेनं इराणच्या बंदरांवरील नाकेबंदी उठवली तर हॉर्मुझची सामुद्रधुनी खुली करायची इराणची तयारी, अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रंप यांची याबाबत राष्ट्रीय पथकाशी चर्चा आणि
5. देशाच्या विविध भागांमध्ये उष्णतेच्या लाटांची शक्यता गृहीत धरून योग्य त्या उपाययोजनांचे केंद्रीय आरोग्य आणि कुटुंबकल्याण मंत्रालयाचे निर्देश.

**<u>पंतप्रधान सिक्कीम दौरा</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज सिक्कीम राज्याच्या स्थापनेच्या सुवर्णमहोत्सवी समारंभात सहभागी होणार आहेत. गंगटोकमधल्या पलजोर स्टेडियममध्ये होणाऱ्या या कार्यक्रमात सिक्कीमचे राज्यपाल प्रकाश माथूर, सिक्कीमचे मुख्यमंत्री प्रेमसिंह तमांग गोले यांच्यासह विविध मंत्री आणि खासदारही सहभागी होणार आहेत. पंतप्रधान मोदी या प्रसंगी सिक्कीमध्ये चार हजार कोटी रुपये खर्चून उभारण्यात येणाऱ्या विविध विकास प्रकल्पांचं भूमिपूजनही करणार आहेत. नामची जिल्ह्यात यांगांग इथं शंभर खाटांच्या आयुर्वेद रुग्णालयाच्या भूमिपूजनाच्या त्यात समावेश आहे. पंतप्रधान या प्रसंगी सभेला संबोधितही करणार आहेत. सिक्कीममधले दीड हजारपेक्षा जास्त कलाकार एक सांस्कृतिक कार्यक्रमही सादर करणार आहेत.

**<u>पंतप्रधान वाराणसी दौरा</u>**

पंतप्रधान आजपासून दोन दिवस वाराणसीच्या दौऱ्यावरही जाणार आहेत. आज सकाळी वाराणसीत ते महिला संमेलनात सहभागी होणार आहेत आणि तसंच सहा हजार साडेतीनशे कोटी रुपये खर्चून उभारण्यात येणाऱ्या विकास प्रकल्पांचं भूमिपूजन करणार आहेत. रेल्वे, रस्ते, पर्यटन आणि शहरी पायाभूत सुविधांशी संबंधित हे प्रकल्प आहेत. पंतप्रधान आज वाराणसी-हडपसर, पुणे आणि अयोध्या-लोकमान्य टिळक टर्मिनस मुंबई या दोन अमृत भारत एक्स्प्रेस रेल्वेंना हिरवा कंदिल दाखवणार आहेत. या दोन रेल्वेंमुळं अमृत भारत एक्स्प्रेस रेल्वेंची संख्या 66 वर पोचली आहे. पंतप्रधान उद्या वाराणसीतील श्री काशी विश्वनाथ मंदिरात दर्शन घेऊन पूजा करणार आहेत. ते उद्यो हर्दोई इथंही जाणार असून, गंगा द्रुतगती महामार्गाचं उद्घाटन करमार आहेत. 36 हजार कोटी रुपये खर्चून हा 594 किलोमीटरचा महामार्ग तयार करण्यात आला आहे.

**<u>भारत-न्यूझीलंड-करार</u>**

भारत आणि न्यूझीलंड यांच्यामधील मुक्त व्यापार कराराला काल अंतिम स्वरूप देण्यात आले. नवी दिल्लीतल्या भारत मंडपम इथं झालेल्या समारंभात केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल आणि न्यूझीलंडचे व्यापार आणि गुंतवणूक मंत्री टॉड मॅक्ले यांनी या करारावर स्वाक्षरी केली. या करारानंतर सर्व प्रकारच्या भारतीय उत्पादनांना

न्यूझीलंडमध्ये शुल्क-मुक्त प्रवेश मिळणार आहे. औद्योगिक वाढ, नावीन्यपूर्ण उपक्रम, पायाभूत सुविधा आणि रोजगार निर्मिती यासाठी न्यूझीलंडने 20 अब्ज अमेरिकी डॉलर्सच्या दीर्घकालीन गुंतवणुकीची वचनबद्धता दर्शवली आहे. भारतानेही न्यूझीलंडमधून येणाऱ्या अनेक उत्पादनांना आयात शुल्कातून सवलत दिली असली, तरी दुग्धव्यवसाय, कृषी तसंच रत्नं आणि आभूषणे यांसारख्या संवेदनशील क्षेत्रांमधील हितसंबंधांचं रक्षण केलं आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दोन्ही देशांमध्ये मुक्त व्यापार करारावर स्वाक्षऱ्या झाल्याचं स्वागत केलं असून आणि दोन्ही देशांमधील भागीदारीतला हा एक ऐतिहासिक क्षण असल्याचं समाजमाध्यमावर म्हटलं आहे.

**<u>पश्चिम बंगाल मतदान</u>**

पश्चिम बंगालमध्ये दुसऱ्या टप्प्यातल्या मतदानासाठी तयारी सुरू आहे. उद्या सात जिल्ह्यांमधल्या 142 मतदारसंघांमध्ये मतदान होणार आहे. काल संध्याकाळी या टप्प्याच्या प्रचाराची सांगता झाली. या टप्प्यात तीन कोटी 21 लाख मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत. या टप्प्यात एक हजार 448 उमेदवार रिंगणात आहेत. सुरक्षेसाठी केंद्रीय दलांच्या दोन हजार 321 तुकड्या तैनात करण्यात आल्या आहेत.

**<u>गुजरात मतमोजणी</u>**

गुजरातमध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठीची मतमोजणी आज होणार आहे. मतमोजणी सुरळीतपणे पार पडण्यासाठी राज्याच्या विविध भागांमध्ये सुरक्षाव्यवस्था मोठ्या प्रमाणावर तैनात करण्यात आली आहे. 15 महापालिका, 84 नगरपालिका 34 जिल्हा पंचायती आणि 260 तालुका पंचायतींसाठी मतमोजणी होणार आहे.

**<u>लदाख-नवीन जिल्हे</u>**

लडाख केंद्रशासित प्रदेशात, पाच नवीन जिल्ह्याच्या निर्मितीला, लडाखचे नायब राज्यपाल विनय कुमार सक्सेना यांनी मंजुरी दिली आहे. यामुळे आता लडाखमधल्या जिल्हयांची एकंदर संख्या सात झाली आहे. या नवीन जिल्ह्यांच्या निर्मितीमुळे प्रशासनाचं विकेंद्रीकरण होण्यास मदत होईल, तसंच, या प्रदेशात विकास, रोजगार आणि उद्योजकतेच्या नवीन संधी उपलब्ध होतील, असं नायब राज्यपाल विनयकुमार सक्सेना यांनी सांगितलं.

**<u>इराण तयारी</u>**

अमेरिकेनं इराणच्या बंदरांवरील नाकेबंदी उठवली तर हॉर्मुझची सामुद्रधुनी खुली करायची तयारी इराणनं दाखवली आहे. पुढच्या टप्प्यात आपल्या आण्विक कार्यक्रमाबाबतही चर्चा करण्याचा प्रस्ताव इराणनं दिला आहे. इराणचे परराष्ट्रमंत्री अब्बास अराघची यांनी यांनी काल रशियाचे अध्यक्ष व्लादिमिर पुतिन आणि परराष्ट्रमंत्री सेर्जेई लावरोव यांची भेट घेतली. त्यात इराणनं ही तयारी दाखवली. अमेरिका आपली युद्धाबाबतची उद्दिष्टं पूर्ण करण्यात अपयशी ठरला असून, पराभूत म्हणून चर्चेची मागणी करत आहे, असा दावा अराघची यांनी केला. इराण-रशियाचे संबंध म्हणजे धोरणात्मक भागिदारी असून पश्चिम आशियातल्या स्थैर्य येण्यासाठी रशिया काम करेल, असं पुतिन म्हणाले. दरम्यान, अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रंप यांनी इराणच्या या ताज्या प्रस्तावाबाबत त्यांच्या राष्ट्रीय सुरक्षा पथकाबरोबर चर्चा केली. व्हाईट हाऊसच्या प्रवक्त्या कॅरोलिन लेविट यांनी ही माहिती दिली, मात्र अधिक तपशील द्यायला नकार दिला. ट्रंप स्वतःच या मुद्यावर लवकरच थेट बोलतील असं त्या म्हणाल्या.

**<u>ऍनालेना बेरबॅक</u>**

संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेच्या ऐंशीव्या सत्राच्या अध्यक्षा ऍनालेना बेरबॉक आज नवी दिल्लीत परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉक्टर एस. जयशंकर यांची भेट घेतील. उभयपक्षी मान्य असलेल्या वेगवेगळ्या मुद्द्यांवर ते चर्चा करतील. इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाच्या प्रतिनिधींबरोबरही बेरबॉक चर्चा करणार आहेत.

**राजनाथसिंह बिश्केक**

संरक्षणंत्री राजनाथसिंह किरगिझस्तानमधल्या बिश्केक इथं पोचले आहेत. शांघाय सहकार्य संघटनेच्या म्हणजे एससीओच्या संरक्षणमंत्र्यांच्या बैठकीत ते सहभागी होणार आहेत. आपला हा दौरा म्हणजे प्रादेशिक शांतता, सुरक्षा आणि संरक्षणविषय सहकार्य यांच्याबाबतची भारताची कटिबद्धता अधोरेखित करतो असं राजनाथसिंह यांनी म्हटलं आहे.

**आयपीएल**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत, काल खेळल्या गेलेल्या सामन्यात, रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरू संघाने, दिल्ली कॅपिटल्स संघाचा 9 गडी राखून पराभव केला. दिल्लीतील अरुण जेटली स्टेडियमवर झालेल्या या सामन्यात, प्रथम फलंदाजीला उतरलेला दिल्ली कॅपिटल्स संघ, सोळा षटकांत केवळ 75 धावा करू शकला. आर सी बी च्या विराट कोहली आणि देवदत्त पदिक्कलनं सातव्या षटकांत हे लक्ष्य साध्य केलं. आज, चंडीगडमध्ये, पंजाब किंग्ज विरुद्ध राजस्थान रॉयल्स सामना रंगणार आहे.

**महिला टी-ट्वेंटी**

महिलांच्या वीस षटकांच्या क्रिकेट स्पर्धेत, दक्षिण आफ्रिकेतल्या, बेनोनी इथं खेळल्या गेलेल्या सामन्यात, दक्षिण आफ्रिका संघानं भारताच्या महिला संघाचा 23 धावांनी पराभव केला आणि यासह पाच सामन्यांची ही मालिका 1-4 अशा मोठ्या फरकानं जिंकली. यजमान संघाच्या 156 धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना, भारताला 20 षटकांत 6 खेळाडूंच्या मोबदल्यात केवळ 132 धावाच करता आल्या. कर्णधार लॉरा वॉल्व्हार्डला 'सामनावीर' आणि 'मालिकावीर' म्हणून गौरवण्यात आलं.

**उष्णता लाट**

चालू उन्हाळ्यात, उष्णतेच्या लाटा येण्याची शक्यता गृहीत धरून, राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांनी योग्य त्या उपाययोजना करून सज्ज राहण्याचे निर्देश केंद्रीय आरोग्य आणि कुटुंबकल्याण मंत्रालयाने दिले आहेत. हवामान विभागाने वर्तवलेल्या अंदाजानुसार, देशाच्या अनेक भागांत, एप्रिल ते जून या कालावधीत, बराच काळ, उष्णतेच्या लाटांचा प्रभाव राहण्याची शक्यता आहे. उष्माघाताच्या व्यवस्थापनासाठी विशेष कक्ष उभारण्याचे, रुग्णवाहिका सेवांची सज्जता सुनिश्चित करण्याचे तसंच उष्णतेच्या लाटांविषयीचे पूर्वसूचना संदेश प्रसारित करण्याचे निर्देश मंत्रालयाच्या सचिव पुण्यसलीला श्रीवास्तव यांनी दिले आहेत.

दरम्यान, महाराष्ट्र, गुजरातसह अनेक राज्यांमध्ये कमाल तापमानात मोठी वाढ झाली आहे. महाराष्ट्रात प्रामुख्यानं विदर्भात काही ठिकाणी कमाल तापमानात लक्षणीय वाढ झाली. येत्या 24 तासात विदर्भात तुरळक ठिकाणी उष्णतेची लाट येण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे. छत्तीसगड, गुजरात, ओडिशा, तेलंगण, राजस्थान या राज्यांमध्ये अनेक ठिकाणी उष्णतेची लाट येण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. आसाम, मेघालय, बिहार, अरुणाचल प्रदेश, मणिपूरसह अनेक राज्यांमध्ये आज मोठा पाऊसही येण्याचा अंदाज हवामान विभागानं व्यक्त केला आहे.

**या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं,**

**नमस्कार.**